**प्रस्तावना :-** शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ७ नग फिरते शौचालय खरेदी करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.

शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ७ नग फिरते शौचालय केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि. ९/०३/२०२२ रोजी मान्यता दिली असता दि.०६/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२३ या कालावधीत निविदा प्रसिद्ध केली असता याकामी २ निविदाकार प्राप्त झाली असता दि.१६/०३/२०२३ ते दि.२३/०३/२०२३ या कालावधी मुदतवाढ करण्यात आली असता याकामी ०८ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर निदर्शनास आले होते.

केंद्र शासन जीईएम पोर्टलवर शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ७ नग फिरते शौचालय उपलब्ध होणेसाठी प्राप्त ८ निविदाकार प्राप्त झाले असून सदर निविदाकार यांनी निविदेच्या अटी-शर्तींनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा. निविदा समिती समक्ष करण्यात आली असता ६ निविदाकार अपात्र व २ निविदाकार पात्र ठरविण्यात आले असता उद्योग उर्जा व कामगार विभाग़ाकडील दि.१ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णय क्रं.४,४,३.१ मधील नमुद तरतुदी नुसार पात्र २ निविदाकार यांचे आर्थिक बोलींचा (लिफाफा क्र.२) लिफाफा खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे त्यांनी एकुण खर्च सादर केले आहे.

| कामाचा तपशील | मे. AMRUTA SNEHAL MUNDHE, | मे.URBAN ENVIROTECH SERVICES PRIVATE LIMITED |
|---|---|---|
| शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ७ नग फिरते शौचालय उपलब्ध करुन घेणे बाबत. | फिरते शौचालय ६ सिट्स असलेले ७ नग करिता<br>एकूण खर्च<br>रु.३१,७०,०००/- | फिरते शौचालय ६ सिट्स असलेले ७ नग करिता<br>एकूण खर्च<br>रु.३८,००,०००/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ७ नग फिरते शौचालय उपलब्ध करुन घेणे करिता मे.AMRUTA SNEHAL MUNDHE,यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.३१,७०,०००/- मात्र भरली आहे.

शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ५ नग फिरते शौचालय उपलब्ध करुन घेणेकरिता रु.३६,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्च रु.३१,५०,०००/- मे.AMRUTA SNEHAL MUNDHE,यांनी भरली आहे.सदर कामी प्राप्त झालेले दर हे निविदे मधील दरा पेक्षा रक्कम रु.४,५०,००० /- इतकी कमी भरली आहे. सद्यास्थितीत खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी.ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** १८५ **दि.** ६/०६ /२०२३

शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ५ नग फिरते शौचालय उपलब्ध करुन घेणेकरिता मे.AMRUTA SNEHAL MUNDHE,यांनी रु.३१,५०,०००/- असे दर सादर केले असून सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, शौचालय विभाग़ासाठी ६ सिट्स असलेले ५ नग फिरते शौचालय उपलब्ध करुन घेणेकरिता केंद्रशासनाच्या GEM पोर्टलवर मे.AMRUTA SNEHAL MUNDHE, यांनी रु.३१,५०,०००/- सर्वात कमी असलेले दर हे मनपाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या (रु.३१,५०,०००/-) निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**

**प्रशासक तथा आयुक्त,**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना** :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन उपलब्ध करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन हे केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि.९/०३/२०२३ रोजी मान्यता दिली असता दि.०६/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२२ या कालावधीत निविदा प्रसिद्ध केली असता याकामी १ निविदाकार प्राप्त झाली असता दि.१६/०३/२०२३ ते दि.२३/०३/२०२३ या कालावधी मुदतवाढ करण्यात आली असता दि.२४/३/२०२३ ते दि.३/४/२०२३ रोजी फेर निविदा प्रसिध्द केली असता ०३ निविदाकार प्राप्त होवुन प्राप्त निविदाकार यांचे लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता प्राप्त दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| कामाचा तपशील | मे. HYUNDAI CONSTRUCTION EQUIPMENT INDIA PRIVATE LIMITED | मे. MSD Engineers | मे. AB EQUIPMENTS (UP) LLP |
|---|---|---|---|
| घनकचरा प्रकल्प १ युनिट पोकलन मशिन उपलब्ध करुन घेणे बाबत. | १ युनिट पोकलन मशिन करिता एकूण खर्च रु.६१,०५,२००/- | १ युनिट पोकलन मशिन करिता एकूण खर्च रु.६२,४५,३००/- | १ युनिट पोकलन मशिन करिता एकूण खर्च. रु.६३,२०,४००/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन करिता मे. HYUNDAI CONSTRUCTION EQUIPMENT INDIA PRIVATE LIMITED यांनी याकामी रु.६१,०५,२००/- इतकी रक्कम सादर केली आहे.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन उपलब्ध करुन होणेकरिता रु.६१,२०,०००/- इतक्या खर्चास मान्यता प्राप्त होवुन प्राप्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दरानुसार रु.१४,८००/- इतकी रक्कम कमी सादर केली आहे. सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** ९८६ **दि.** ६/०६ **/२०२३**

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन उपलब्ध करुन होणेकरिता मे.HYUNDAI CONSTRUCTION EQUIPMENT INDIA PRIVATE LIMITED,यांनी रु.६१,०७,२००/- असे दर सादर केले असून सादर केलेल्या प्राप्त खर्चास व निविदाकाराक मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४७२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट पोकलन मशिन उपलब्ध करुन घेणेकरिता केंद्रशासनाच्या GEM पोर्टलवर मे. HYUNDAI CONSTRUCTION EQUIPMENT INDIA PRIVATE LIMITED,यांनी पोकलन मशीनकरिता रु.६१,०७,२००/- इतकी रक्कम सादर केली असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या (रु.६१,०७,२००/-) निविदेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**